प.८९.

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

## लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक ०८.०६.२०२१
## इतिवृत्त क्रमांक — १९

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्तीकरीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची बैठक दि. ०८.०६.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त (प्रशासन) :- सदस्य
३) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.

Scanned with CamScanner

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११

(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील मा.शासन परिपत्रक क्र.सफाई -२०१४ /प्र.क्र.०७/महामंडळे दि.२६ फेब्रुवारी २०१४

(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

**विषय क्र.०१ :- निकाली काढण्यात आलेले एकुण १४ प्रकरणे**

**विषय क्र..०२ :- दि.२३.१०.२०२० रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेले प्रलंबित एकुण १३ प्रकरणे**

**विषय क्र..०३ :- शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती देणेबाबतचे एकुण २ प्रकरणे.**

वरील प्रमाणे विषय क्रमांकानुसार कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत सांगोपांग चर्चा करणेत आली व त्याबावत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे.

(१) विषय सुचीमधील नामनिर्देशीत वारसाबाबतची निकाली काढण्यात आलेली प्रकरणे मा. आयुक्त महोदय यांचेकडेस प्रकरण निहाय कारणमिमांसा देवुन पुन:र्जिवीत करणेकामी सादर करुन मा. आयुक्त महोदय यांची मान्यता घेऊन कर्मचारी निवड समितीसमोर शिफारशीकरीता सादर करण्यात यावे.

(२) दि.२३.१०.२०२० रोजीच्या बैठकीत शिफारस केलेनुसार बैठकीचे इतिवृत्त मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेस ठेवुन पुढील कार्यवाही करावी.

(३) शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती देणेबाबतचे एकुण २ प्रकरणी सरळसेवा नियमानुसार रिक्तपदाबाबत सामान्य प्रशासन विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा.

(४) निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांबाबत सुधारीत अर्ज आल्यास त्याबाबत वेगळे निर्णय घेण्याची आवश्यकता नसल्याने अशी प्रकरणे यापुर्वी अपात्र करण्यात आले असल्याने कर्मचारी निवड समितीसमोर पुन:श्च ठेवु नये व अर्जदारास तसे कळविण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे.

उपरोक्त नमुद नुसार दिलेल्या निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

21/6/21

(डॉ.कल्पना कुटे)
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

(अर्चना तांबे)
**उपआयुक्त (समाजकल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

(नरेंद्र महाजन)
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

(बी. जी. सोनकांबळे)
**मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(मनोज घोडे पाटील )**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(डॉ.प्रविण आष्टीकर)**
**अतिरिक्त आयुक्त,सेवा**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक

Scanned with CamScanner